REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331 (UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# सुक्ष्म वित्त आणि वित्तीय समावेशनाचे इतर पर्याय



श्री.पठाण आर.एम.
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज,वाघोली.
ता.कोरेगाव जि.सातारा.
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर संलग्न

## प्रस्तावना:

भारतातील ग्रामीण भागातील कर्जबाजारीपणाचे सर्वेक्षण(All India Rural Credit Survey) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने १९४७ साली केले होते.या सर्वेक्षणावरून असे दिसून आले होते की ग्रामीण भागातील जनतेला सावकार व सराफी पेढीवाल्या कडून ९०%कर्ज पुरवठा होतो,तर फक्त एकच टक्का कर्ज पुरवठा बँका मार्फत होतो.सर्वसामान्यांना बँकींगच्या सेवा उपलब्ध व्हाव्यात म्हणून सरकारने १९६९ साली १४ खाजगी बँकांचे व १९८० साली ६ सर्वात मोठ्या खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले होते.वित्तीय समावेशन साधने देशासमोरील महत्वाचे आव्हान आहे.भारतातील ६७.२५%(२०१५)जनता ग्रामीण भागात राहते.ग्रामीण तसेच आदिवासी व दुर्गम भागातील जनतेला बँकींग व तत्सम सेवांचा लाभ मिळत नाही.वीस मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्यानंतर देखिल कित्येक लोकांचे बँकेत खाते नाही व कित्येक लोकांना संस्थागत स्वरूपात कर्ज पुरवठा उपलब्ध होत नाही.एकूण लोकसंख्ये पैकी २५ % लोकांचा जीवन विमा उतरवलेला आहे तर फक्त ०.८% लोकांनी सर्वसाधारण विमा (स्थावर व जंगम मालमत्ता) उतरवलेला आहे. भारत वित्तीय सेवा पासून वंचित कुटूंबे असलेला जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे.अलीकडे ही परिस्थिती थोडी फार बदलली आहे.आर.बी.आय.च्या माहिती नुसार ८ मे २०१५ मध्ये एकूण ९७८ दशलक्ष बचत खाती देशात चालू होती किंवा कार्यरत होती.क्रियाशील आर्थिक सेवा समाजाचा व पर्यायाने देशाचा आर्थिक विकास करीत असतात.समाजात आर्थिक सुरक्षांचे जाळे उपलब्ध असेल तर लोक आर्थिक समस्यांना यशस्वीरीत्या तोंड देऊ शकतात.त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला संस्थागत आर्थिक उत्पादन किंवा सेवा किफायतशीर किमतीला मिळणे आवश्यक आहे.बँकांमार्फत व काही प्रमाणात स्वयंसेवी संघटना मार्फत बेरोजगार किंवा अल्पउत्पन्न गटातील लोकांना सुक्ष्म वित्त पुरवठा उपलब्ध झाल्यास वित्तीय समावेशनास मदत झाली असे म्हणता येईल.

## संशोधनाची उद्धिष्टये:

१) सुक्ष्म वित्त पुरवठ्याची वित्तीय समावेशनातील भुमिका जाणून घेणे.
२) स्वयंसहाय्यता गटाची प्रगती व समस्या जाणून घेणे.
३) वित्तीय समावेशनाचे महत्व जाणून घेऊन भारतातील वित्तीय प्रणाली समजून घेणे.
४) वित्तीय समावेशनाचे इतर मार्ग जाणून घेणे.

## संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम माहिती स्त्रोताचा वापर केलेला असून विविध संदर्भ ग्रंथ, संशोधनपर लेख,वर्तमान पत्रातील लेखांचा व वेब साईटचा आधार घेण्यात आलेला आहे.

## पुर्व संशोधनाचा आढावा:

भारतातील अनेक संशोधन व अनुदान देणाऱ्या संस्थांनी आणि अम्मलबजावणी करणाऱ्या संस्थांनी स्वयंसहाय्यता गटाचे व त्यांच्या संघटनेचे परिक्षण,परिणामपर संशोधन व मुल्यांकन केलेले आहे.त्यामुळे तुलनात्मक पुनर्परीक्षण करणे काहीसे कठीण वाटते.ईडीएल रूरल सिस्टीम आणि आंध्रप्रदेश महिला अभिवृध्दी सोसायटी(APMAS) यांनी सेल्फ हेल्प ग्रुप इन इंडिया: अ स्टडी ऑफ द लाईट ॲण्ड डार्क साईडस् या नावाने आंध्रप्रदेश,कर्नाटक,ओरिसा व राजस्थान राज्यातील २१४ स्वयंसहाय्यता गटांचे २००६ मध्ये संशोधन केलेले होते.त्यांच्या संशोधनपर अभ्यासावरून असे दिसून आले की स्वयंसहाय्यता गटात जवळ-जवळ ५०% सभासद गरीबी रेषे खालील अनुसुचित जाती व जमातींचे होते.तसेच बहुतांशी गट प्रमुख मात्र उच्च वर्गीय कुटुंबातील होते.गटात वेगवेगळ्या जाती-जमातींच्या लोकांचे आणि स्त्रीयांचे सदस्य असलेतरी हे गट समाजात सौहार्द टिकवून ठेवण्याचे कार्य करीत होते.गटांच्या कर्जाच्या मागणी बाबतीत या गटांना बँकांनी कर्ज पुरवठा केलेला होता मात्र काही सदस्यांनी सदस्य नसणाऱ्या लोकांना परस्पर पैसे दिलेले होते.तसेच या अभ्यासावरून प्रकर्षाने असे दिसून आले की दक्षिण भारतातील बँकांनी स्वयंसहाय्यता गटांना कर्ज पुरवठा करण्यात पुढाकार घेतल्यामुळे गटांची कर्ज फेडण्याच्या बाबतीत वाईट परिस्थिती होती.पन्नास टक्के गट मात्र फायद्यात होते.परंतु कर्जाच्या थकबाकीचे उच्च प्रमाण व व्याजाचा अल्प दर यामुळे सदस्यांच्या बचतीचे वित्तीय मुल्य राखले जात नव्हते.गटाच्या संख्यात्मक वाढी पेक्षा गटाच्या अपेक्षित गुणात्मक वाढीकडे लक्ष देणे महत्वाचे होते. एस.पोरकोडी आणि डॉ.डी.अरवाझी यांनी(मार्च २०१३)रोल ऑफ मायक्रोफायनान्स् ॲण्ड सेल्फ हेल्प ग्रुप इन फिनान्शीअल इन्क्लूजन या आपल्या संशोधनपर लेखात असे म्हंटले आहे की सुक्ष्म वित्त संस्था (MFIs)वित्तीय समावेशनातील अविभाज्य घटक व साधन असून या संस्था समाजातील तळागाळातील लोकापर्यंत पोहोचण्याचे काम करतात.परंतु या संस्थांनी आपल्या कार्यात संतुलन साधण्याची गरज आहे.कारण भारतातील सुक्ष्म वित्त संस्था सध्या तणावाखाली काम करीत आहेत.दिपींदर कौर (डिसेंबर२०१५)यांनी मायक्रोफायनान्स-अ टुल फॉर फिनान्शीअल इन्क्लूजन इन इंडिया या आपल्या संशोधनपर लेखात असे लिहीले आहे की-स्वयंसहाय्यता गटातील सदस्यांना सुक्ष्म वित्त व स्वयंसहाय्यता गट बँक संयोजन कार्यक्रमा(Bank Linkage Programme) विषयी माहिती आहे परंतु या योजनेचा सभासदांना फायदा होत नाही.तसेच गटात सहभागी झाल्यानंतर संबंधीत सदस्य प्रशिक्षण घेत नाहीत त्यामुळे हा कार्यक्रम परिणामकारक होण्यासाठी आवश्यक पावले उचलणे गरजेचे आहे. ए.अमरेंदर रेड्डी आणि धर्म पाल मलीक (२०११)यांनी अ रिव्हीव ऑफ सेल्फ हेल्प ग्रुप-बँक लिकेज प्रोग्राम इन इंडिया या आपल्या संशोधनपर लेखात असा अनुमान काढला आहे की-भारतातील उत्तर,पूर्व आणि उत्तरपूर्व विभागात स्वयंसहाय्यता गटांचा विस्तार झालेला नाही.या भागात बँकांच्या कमकुवत जाळयामुळे व सामाजिक मागासलेपणामुळे स्वयंसहाय्यता गटांचा विस्तार होणे बाकी आहे.

## संशोधनाचे महत्व:

भारतातील सुक्ष्म वित्त पुरवठा आणि वित्तीय समावेशन समजून घेण्याच्या दृष्टीने या संशोधन लेखाचे महत्व आहे. तसेच सुक्ष्म वित्त पुरवठ्याच्या माध्यमातून चालवल्या जाणाऱ्या स्वयंसहाय्यता गटाचा उपयोग करणाऱ्या सहयोगिनी,प्रेरक,पंचायतराज,बँका व सामाजिक कार्यकर्ते यांच्या दृष्टीने या लेखाचे महत्व आहे.

## सुक्ष्म वित्त:

बँकींग क्षेत्रात अनेक प्रकारचे तांत्रिक बदल झालेले आहेत.उदा.निरंतर प्रदान मशिनचा वापर(ए.टी.एम),पत व कर्ज कार्डस्,इंटरनेट बँकींग,ऑनलाईन पैशाचे हस्तांतरण,मोबाईल बँकींग इ.परंतु महत्वाचा मुद्दा म्हणजे या तांत्रिक बदलाचा फायदा ठराविक लोकांनाच होत आहे.समाजातील तळागाळातील व असंघटीत लोकांना या सेवांचा फायदा मिळत नाही. या संकल्पनेला वित्तीय बहिष्करण (Financial exclusion)असे संबोधता येईल.(एस.पोरकोडी आणि डॉ.डी.अरवाझी) वित्तीय बहिष्करण हे भौगोलीक कारणाने किंवा बँकींग सेवेच्या मोबदल्या वरून किंवा लोकांच्या अज्ञानीपणामुळे किंवा स्वत: स्विकारलेले असू शकते.वित्तीय बहिष्काराची कारणे थोडक्यात पुढील प्रमाणे सांगता येतील १) बँक सेवा स्विकारताना बँकांनी घातलेल्या अटी व नियमावली२) ओळखपत्राची आवश्यकता ३) मानसशास्त्रीय व सांस्कृतीक अडथळे ४) बँकांचा दृष्टीकोण इ.

समाजात आर्थिक सेवांच्या वापरा बाबत किंवा उपभोगा बाबत दरी निर्माण झाली आहे.वैयक्तीक वित्त पर्याया बाबत उच्च व मध्यम वर्गातील उच्च वर्गीय लोक आणि बँकींगच्या प्राथमिक सेवा न मिळणारा(Unbankable)वर्ग यांच्यात ही दरी वाढत आहे.गरीब व बेरोजगार लोकांना बँकेद्वारे कर्ज पुरवठा करण्यावर मर्यादा येतात.यावर उपाय म्हणून भारतात सुक्ष्मवित्त पुरवठ्याची व वित्तीय समावेशनाची संकल्पना पुढे आली.सुक्ष्म वित्त म्हणजे-बँकेद्वारा बेरोजगार किंवा अल्पउत्पन्न गटातील लोकांना किंवा ज्या लोकांना बँकेद्वारा बँकींगच्या सेवा मिळत नाहीत अशा लोकांना बँकींगच्या सेवा पुरविणे की ज्याच्यामुळे असे लोक आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनतील व ते पैशाची बचत करून बँकेत पैशाची देवाण-घेवाण करतील.सुक्ष्मवित्त पुरवठ्यात असंघटीत क्षेत्रातील व ग्रामीण भागातील लोकांना वित्त पुरवठा करणे हा मुख्य हेतु असतो.भारतात सुक्ष्म वित्त पुरवठ्यासाठी विविध प्रकारचे नमुने कार्यरत आहेत.तज्ञांच्यामते भारताच्या भौगोलीक आकारमानामुळे हे नमुने आपआपल्या क्षेत्रात यशस्वी झालेले आहेत.ते पुढील प्रमाणे-

**१)ग्रामीण नमुना-** (Grameen bank model) ग्रामीण नमुना बांगला देशात यशस्वी झालेल्या ग्रामीण ८०० बँकेसारखा आहे.भारतातील अनेक संघटनांनी थोडाफार बदल करून या बँकेची कार्यशैली स्विकारून शेअर मायक्रोफायनान्स लिमीटेड,अॅक्टीवीटी फॉर सोशल अलटरनेटीव्हज् आणि कॅशोर फिनान्शीअल अॅण्ड टेक्निकल सर्व्हिस लिमीटेड अशा संस्था स्थापन केलेल्या आहेत.या नमुन्यात गटाच्या कार्यशैलीचे सात दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या व्यक्तीला सदस्य नोंदणी शुल्क भरून सदस्य बनता येते.समान विचारांच्या गरजु पाच व्यक्ती एकत्र येऊन आपला गट तयार करू शकतात व नंतर आठ गटांचा एक मध्यवर्ती केंद्रीय गट बनविला जातो.प्रत्येक सदस्याला प्रत्येक आठवड्याला रूपये दहा गटात जमा करावेच लागतात.गटाची प्रत्येक आठवड्याला बैठक होत असते.बैठकीत गटाचा कर्मचारी वर्ग सुध्दा सहभागी होत असतो.गटातील सदस्याच्या विश्वासावर गरजुंना लगेच कर्ज दिले जाते.सदस्याला पहिल्या वर्षी ४००० रूपये कर्ज दिले जाते.पुढील वर्षी कर्ज हवे असल्यास पहिल्या वर्षीच्या ४००० रूपयात रूपये १००० वाढवून ५००० रूपये कर्ज दिले जाते.अशा प्रकारे जास्तीत जास्त १०,००० रूपया पर्यंत कर्ज दिले जाते.व्याजाचा दर वार्षिक १५ ते २४ टक्क्या दरम्यान असतो.उत्पादक कारणासाठी दिलेल्या कर्जावर ५ टक्के अतिरीक्त कर लावला जातो व हा कररूपी निधी गटाच्या उन्नतीसाठी उपयोगात आणला जातो.कर्ज कोणत्याही कारणासाठी दिले जाते.उदा.गृहबांधनीसाठी,शौचालय बांधनीसाठी,शेतीत सुधारणा करण्यासाठी इ.ग्रामीण गटाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ठ म्हणजे थकबाकीचे प्रमाण अत्यअल्प असल्यामुळे व कर्ज फेडीचे प्रमाण ९८ टक्कयाच्यावर असल्यामुळे सरकार कडून व आंतरराष्ट्रीय देणगीदाराकडून अल्प दरात गटाला निधी उपलब्ध होतो.

**२) स्वयंसहाय्यता गट-**(SHG model) स्वयंसहाय्यता गटात कमीत-कमी १० व जास्तीत जास्त २० पुरूष किंवा स्त्रिया एकत्र येऊन आपला गट तयार करू शकतात. स्वयंसहाय्यता गटाची चळवळ बचत गट,समुह गट,शेअर गट,सुक्ष्म वित्त,स्वल्प वित्त समुह,स्वावलंबी बचत गट,काटकसर व कर्ज गट या नावाने ओळखली जाते.स्वयंसहाय्यता गटाची व्याख्या पुढील प्रमाणे सांगता येईल-" ज्या समुहात १० ते २० सभासदांची निवड करून नियमित बचतीतून एकमेकांच्या गरजा,अडचणी,जीवनमुल्ये उंचावण्यासाठी कर्ज स्वरूपात अर्थसहाय्य केले जाते,उद्योगधंदा उभारला जातो.सर्वानुमते निर्णय घेऊन संघटन शक्ती वाढवली जाते,परस्पर सहकार्य,सहभाग,नेतृत्व व कर्तव्य,विचारांची देवाण-घेवाण,सातत्यपूर्ण व प्रयत्नशील सदस्यांच्या समुहाला स्वयंसहाय्यता गट म्हणतात."(डॉ.एम.यु.मुलाणी२००९)

सुक्ष्म वित्ताचे क्षेत्र बहुतांशी अशासकीय संघटनाकडून(छक्र्जी)चालवीले जाते.भारतातील सुक्ष्म वित्त पुरवठ्याची सुरूवात नाबार्डच्या पुढाकाराने १९९२ मध्ये झाली.सुक्ष्म वित्त पुरवठ्याच्या माध्यमातून समाजात प्रथम स्वयंसहाय्यता गट स्थापन झाले.भारतातील अनेक स्वयंसहाय्यता गट नाबार्डच्या माध्यमातून स्थानिक बँकांशी संलग्न आहेत.हे गट स्वत:च्या जमा झालेल्या बचतीच्या किंवा भांडवलाच्या आधारावर व गटाच्या हमीवर बँकेतून कर्ज घेऊन चालविले जातात.भारतातील ९० टक्के गट स्त्रियांनी स्थापन केलेले आहेत.

**३) संघीय स्वयंसहाय्यता गट** (Federated SHG model/SHG Federation)सुक्ष्म सहाय्यता गट आकाराने लहान असल्यामुळे त्यांच्या वित्तीय सेवावर मर्यादा येतात.या मर्यादावर उपाय म्हणून संघीय स्वरूपाचे स्वयंसहाय्यता गट स्थापन झालेले आहेत.संघ मंडळ नोंदणी कायद्यानुसार नोंदविला जातो.यात १०० सदस्य असून संघाची त्रिस्तरीय रचना असते.पहिल्या स्तरावर स्वयंसहाय्यता गट येतात,मध्यवर्ती स्तरावर प्रत्येक गटातील दोन सदस्य असतात.हा स्तर स्वयंसहाय्यता गटात व

सर्वोच्च मंडळात मध्यस्थी करण्याचे काम करतो. तर सर्वात वरच्या स्तरावर दहा ते वीस सदस्यांचे सर्वोच्च मंडळ असते व ते सर्व समुहाचे प्रतिनिधीत्व करते.हे मंडळ सर्व गटाशी व आर्थिक सहाय्य करणाऱ्या अशासकीय संस्थांशी दुवा साधण्याचे काम करते.तसेच गटांना कर्ज वसुलीत हातभार लाऊन कमकुवत गटांना बळ देण्याचे काम करते तसेच गटातील निष्क्रीय पैसा गरजु गटाकडे वळविण्याचे काम करते.भारतात यशस्वी झालेल्या संघीय स्वयंसहाय्यता गटाची नावे पुढील प्रमाणे सांगता येतील- प्रधान,चैतन्य,सेवा आणि धन फाऊंडेशन इ.

**४) सहकारी नमुना-**(Cooperative model) सहकारी पत संघटना हा ग्रामीण भागात सुक्ष्म वित्त पुरवठ्याचा यशस्वी झालेला आदर्श नमुना आहे.हैद्राबाद मधील को-ऑपरेटीव्ह डेव्हलपमेंट फोरम या मंचाने हा नमुना यशस्वी केलेला आहे.नंतर या नमुन्याचे अनुकरण करून अनेक ठिकाणी सहकारी पत संघटना स्थापन झालेल्या आहेत.यात सहकारी तत्वावर एकाच गावातील ३०० पुरूष किंवा स्त्रियांची पत संघटना तयार करून काटकसरीला व बचतीला प्रोत्साहन दिले जाते.गटातील १० ते १५ सदस्यांचे प्रशासकीय सेवेसाठी नंतर वेगवेगळे गट केले जातात व त्यावर एक गट प्रमुख नेमला जातो.हा गट प्रमुख गटाची बैठक घेण्याचे,बचत जमा करण्याचे,कर्ज वितरणाचे व कर्ज वसुलीचे कार्य करतो.गटातील सर्व सदस्यांची वर्षातून एकदा बैठक होत असते त्यातून १२ संचालकांची निवड होत असते.संचालक मंडळ आपला प्रतिनिधी म्हणून एका अध्यक्षाची व एका कार्यकारी संचालकाची निवड करीत असते.संचालक मंडळाचा कार्यकाल एका वर्षाचा असतो.संघटनेला कायदेशीर अस्तित्व असते.आंध्रप्रदेश मध्ये आंध्रप्रदेश म्यूच्युअली एडेड सोसायटी ॲक्ट नुसार या संघटनेची नोंद होते.

**५) फिरती बचत व पत संघटना**(Rotating Saving and Credit Associations) या नमुन्यात सदस्य व्यवसायाच्या,समाजाच्या किंवा वंशाच्या आधारावर संघटनेत सहभागी होत असतो व आपला पैशाचा किंवा बचतीचा वाटा ठराविक कालावधीनंतर भविष्यात कर्ज मिळण्याच्या हेतूने जमा करीत असतो.प्रत्येक सदस्याला पध्दतशीररीत्या कर्ज मिळत असते.प्रत्येक सदस्य त्यापुढील सदस्याला वेळेवर कर्ज फेडीची रक्कम देत असतो.त्यामुळे कर्ज वाटपाची क्रिया चालू राहते.कर्ज मंजूरीसाठी सर्व सदस्यांचे अनुमोदन असते.भारतातील चिट फंडाची पद्धत फिरत्या बचत व पत संघटनेच्या कार्याशी काहीअंशी समान आहे.

**६) सुक्ष्म वित्त संस्था किंवा कंपनी किंवा प्रमंडळ** (Microfinance companies) ग्रामीण भागात ज्या गावात प्रमंडळ स्थापन करायचे असते त्या गावाचे प्रथम सर्वसमावेशक सर्वेक्षण केले जाते.नंतर लोकांना संस्थेची धेये,कार्यपध्दती व सेवांविषयी माहिती दिली जाते.स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन सामुहीक जबाबदारीच्या तत्वावर प्रथम पाच इच्छुकांचा गट तयार केला जातो.गरजे नुसार गटांची संख्या वाढत असते.साधारणत: प्रत्येक गटावर दोन गट प्रमुख असतात.नंतर इच्छुकांना पाच दिवसांचे प्रशिक्षण दिले जाते.प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर क्षेत्रीय कर्मचारी पहिल्या बैठकीला सर्व इच्छुकांच्या कागदपत्रांची छाननी करून सदस्य नोंदनी करतो व संस्था स्थापन करतो.दुसऱ्या बैठकीत कर्ज वितरीत केले जाते.काही संस्थात कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर सर्वांना कर्ज वितरीत केले जाते तर काही संस्थात प्रथम काही सदस्यांना कर्ज वितरीत केले जाते व उर्वरीत सदस्यांना दोन आठवड्यानंतर कर्ज वितरीत केले जाते.क्षेत्रीय कर्मचारी सदस्यांनी घेतलेल्या कर्जाच्या उपयोगीतेकडे लक्ष ठेऊन असतो.कर्ज ५० ते ५५ आठवड्यासाठी दिले जाते व परतफेड प्रत्येक आठवड्याला केली जाते.अशासकीय संस्था किंवा स्वयंसहाय्यता गट कर्जासाठी फंड उभारण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब करतात.शक्यतो फंड बँकेमार्फत कर्ज रूपात घेतला जातो.फंड बँकेकडून अशासकीय संस्थेला दिला जातो व अशासकीय संस्था स्वयंसहाय्यता गटाला फंड पूरविते व नंतर स्वयंसहाय्यता गट गरजु सदस्यांना पैशाचे वाटप करतो.भारतात सुक्ष्म वित्त संस्थेची नोंदणी सोसायटी ॲक्ट नुसार किंवा इंडियन ट्रस्ट ॲक्ट नुसार किंवा सेकशन २५ कंपनी ॲक्ट नुसार किंवा बँकेत्तर वित्तीय संस्थे नुसार होऊ शकते.ज्या ॲक्ट नुसार नोंदनी केलेली असते त्या नुसार प्रमंडळाचे कार्य चालते व कार्याचा विस्तार असतो.

**वित्तीय समावेशन:**

वित्तीय समावेशन म्हणजे-समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास व कमी उत्पन्न असलेल्या असंघटीत लोकांसाठी वित्तीय सेवा प्रदान करणे होय.या सेवात मुख्यत: कर्ज पुरवठा,पैशाची देवाण-घेवाण,प्रतीभूतींची खरेदी-विक्री व समाजातील प्रमुख संस्थागत विमा कंपन्याद्वारा योग्य किमतीला व पारदर्शी स्वरूपात विमा सेवा पुरवठा करणे इत्यादीचा समावेश होतो.या सेवा पुरविताना कमीत-कमी मोबदला घेतला जातो.विस्तृत अर्थाने वित्तीय सेवांच्या व्याप्तीतीत १) स्वस्त कर्ज पुरवठा२) ज्यांचे बँकेत बचत खाते नाही अशांचे खाते उघडणे ३) बँकेमार्फत पैशाची देवाण-घेवाण ४) आर्थिक सल्ला ५) पत/कर्ज कार्डसूचे वितरण व

वापरासाठी प्रेरणा ६) विमा सेवा प्रदान करणे ७) स्वयंसहाय्यता गटाचे सबलीकरण इत्यादीचा समावेश होतो.भारतात वित्तीय समावेशन ही एक चळवळ म्हणून पाहिले जात आहे.भारत सरकारने वित्तीय समावेशनाचा प्रश्न हाताळण्यासाठी डॉ.सी.रंगराजन यांच्या अध्यक्षते खाली एक समिती नेमलेली होती.प्राईस वॉटर कुपर यांच्या सर्वेक्षणा नुसार भारतातील ५५७ दशलक्ष लोक २०११ साली तर २३३ दशलक्ष लोक २०१५ साली बँकींग सेवेपासून वंचित होते.

नोहेंबर २०१६ च्या आकडेवारी नुसार भारतातील १६७ दशलक्ष लोक,बांगला देशातील १६१ दशलक्ष लोक,रशियातील १४६ दशलक्ष लोक,तर जपान मधील १२६ दशलक्ष लोक बँकींग सेवेपासून वंचीत होते.(रोहन व्यंकटरमनकृष्णन) वित्तीय समावेशनाचा प्रश्न विकसीत,विकसनशील व अविकसीत देशांना भेडसावत आहे.

वित्तीय समावेशनाचा एक भाग म्हणून भारताच्या अर्थ मंत्रालयाने व भारतीय रिझर्व्ह बँकेने जी जनधन योजना २८ ऑगस्ट २०१४ ला चालू केली त्याच दिवशी दिड कोटी खाती उघडली गेली होती.(मोदी राज,दैनिक लोकसत्ता २६ मे २०१७) तसेच ७ ऑक्टोबर २०१५ पर्यंत १८७ दशलक्ष जनधन खाती उघडली गेली होती व या खात्यात २५,०००कोटी रूपये जमा झाले होते.या योजनेचा पुढे विस्तार होऊन ९ नोहेंबर २०१६ अखेर ६८ दशलक्ष जनधन बँक खाती उघडली गेली.तरी सुद्धा १६५ दशलक्ष लोक बँकींग सेवेपासून वंचीत आहेत.एका कुटूंबात चार व्यक्ती अपेक्षीत धरल्यास ४१ दशलक्ष कुटुंबे बँकींग सेवेपासून वंचीत आहेत.या सर्वाचा विचार केल्यास भारत जगातील बँक खाती नसलेला आठव्या क्रमांकाचा मोठा देश म्हणून ओळखला जातो.(रोहन व्यंकटरमनकृष्णन) एप्रिल २०१७ च्या आकडेवारी नुसार देशातील बँकामध्ये २८.३८ कोटी जनधन खाती नोंदवलेली असून त्यात ६३,९६०,१७ कोटी रोख रक्कम जमा झालेली होती.(मोदी राज,दैनिक लोकसत्ता २६ मे २०१७) सर्व समावेशक वित्तीय प्रणाली उत्पादन साधनांचे परिणामकारकरित्या वाटप करते व भांडवल खर्च कमी करण्यास मदत करते.तसेच विविध प्रकारच्या क्षमतात वाढ करून दररोज लागणाऱ्या पैशाचे विश्वसनीयरीत्या हस्तांतरण करते.वित्तीय व्यवस्थापनामुळे व वित्तीय समावेशनामुळे महत्तम सामाजिक कल्याणाचा हेतू साध्य होतो.

## सुक्ष्म वित्त इतिहास:

मानवाच्या विकासाच्या इतिहासापासून जगातील वेगवेगळ्या भागात पैसे उसने व कर्जाऊ देण्या-घेण्याचे व्यवहार अस्तित्वात होते.भारतात सुध्दा पैसे कर्जाऊ देण्याचे वैयक्तीक प्रकार उदा.चिठ्ठी व केरळ मधील मलबार येथील कुरीकल्याणम् यासारखे प्रकार अस्तित्वात होते.या स्थानिक वित्तीय संस्था एका अर्थाने सुक्ष्म वित्त पुरवठा करण्याचे उपक्रम चालवित होत्या.परंतु भारतात सुक्ष्म वित्त पुरवठ्याचा आधुनिक प्रकार १९७० नंतर सुरू झालेला आढळतो.

सुक्ष्मवित्ता विषयी सन १८०० च्या मध्यास लेसॅन्डर स्पुनर यांनी छोट्या उद्योगांना व शेतकाऱ्यांना सुक्ष्मवित्त पुरवठा केल्यास समाजातील गरीबी कमी होण्यास मदत होईल असे लिहीलेले आढळते.सुक्ष्मवित्त पुरवठ्या बाबत खरी सुरूवात १९७० च्या सुमारास बांगला देशात सुक्ष्मवित्त पुरवठ्याचे प्रणेते मोहोमद युनुस यांनी “ग्रामीण बँक ऑफ बांगलादेश” स्थापन करून केलेली होती.त्यानंतर अशाच प्रकारचा यशस्वी प्रयोग अख्तार हमीदखान यांनी सुध्दा केलेला होता.या कालावधीत सुक्ष्मवित्त पुरवठ्याचा मोठ्या प्रमाणात प्रसार होऊन ग्रामीण भागातील स्त्रियांना याचा मोठ्या प्रमाणात लाभ झालेला होता.त्यानंतर पहिली सुक्ष्मवित्त व समाज विकास बँक (शोअर बँक Shore bank)१९७४ मध्ये शिकागो येथे स्थापन झालेली आढळते.तसेच अशाच प्रकारचे कार्य करणारी ग्रामीण बँक चळवळ जर्मनी मध्ये १८६४ साली फेडरीक विल्यम रफायझन यांनी सुरू केलेली होती.तसेच गरीबी निर्मुलनासाठी सुक्ष्मवित्त पुरवठ्याच्या स्वरूपात कैसे पॉप्युलर चळवळ (Caisse Populaire Movement) क्युबेक येथे अल्फोन आणि डॉरिमेन डेसजर्डीन यांनी १९०० ते १९०६ या कालावधीत सुरू ठेवलेली होती.आज जागतीक बँकेच्या अंदाजानुसार जगातील १६ दशलक्ष लोक ७००० सुक्ष्मवित्त संस्थांशी जोडलेले आहेत.तसेच जगातील ३४ मुख्य संघटनांच्या मदतीने चालवल्या जाणाऱ्या गरीबांना मदतीचा सल्ला देणाऱ्या गटाच्या (Group to Assist the poor ) (CGAP) तज्ञांच्या मते ५०० दशलक्ष कुटुंबे सुक्ष्मवित्त पुरवठ्याच्या माध्यमातून नवीन लघुउद्योग स्थापन करू शकले आहेत.

सन २००५ हे वर्ष “आंतरराष्ट्रीय सुक्ष्मवित्त वर्ष”म्हणून युनायटेड नेशनच्या द इकॉनॉमी अ‍ॅण्ड सोशल कौन्सील यांनी जाहीर केलेले आहे.जगातील गरीब लोकांमध्ये उद्योग उभारणीत चैतन्य निर्माण व्हावे म्हणून जागतीक सुक्ष्मवित्त वर्षाच्या निमीत्ताने अनेक कार्यक्रम आखलेले आहेत.सुक्ष्मवित्त पुरवठ्याचे प्रणेते मोहोमद युनुस यांना त्यांच्या कार्याबद्दल आणि आर्थिक व

सामाजीक विकासासाठी ग्रामीण बँक ऑफ बांगलादेश या बँकेस २००६ चा जागतीक शांतता पुरस्कार विभागून देण्यात आलेला होता.जगातील अनेक देशांनी वित्तीय समावेशनासाठी एक मार्ग म्हणून सुक्ष्म वित्त पुरवठ्याच्या स्वरूपात बांगला देशातील ग्रामीण ८०० बँकेचे अनुकरण केलेले आहे.

**भारतातील सुक्ष्म वित्त व वित्तीय समावेशन:**

भारतातील बहूतांशी गरीब जनता ग्रामीण भागात वास्तव्यास असल्यामुळे भारत सरकारने गरीबी निर्मूलनासाठी गरीबांचा वित्तीय सेवांशी संबंध वाढवण्यासाठी स्वतंत्रप्राप्ती नंतर प्रयत्न सुरू केला त्यासाठी सहकारी बँकांची,विभागीय ग्रामीण बँकांची व नाबार्डची स्थापना केली.परंतु तळागाळातील व असंघटीत क्षेत्रातील अनेक गरीब लोक वित्तीय सेवेपासून वंचित राहीलेले होते.या गरीब लोकांची सुक्ष्म वित्ताची गरज भागविण्याचा प्रयत्न स्वयंसेवी संस्थांनी व सरकारने बँकांच्या मदतीने केला.सुक्ष्म वित्ताचा कार्यक्रम समाजातिल वित्तीय सेवा पासून वंचित असणाऱ्या गरीब व असंघटीत क्षेत्रातील लोकांसाठी राबविला जातो.बँकांशी संलग्न असलेल्या स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून सुक्ष्म वित्त पुरवठ्याचा कार्यक्रम परिणामकारकरित्या राबविता येतो व त्यामुळे वित्तीय समावेशन साधण्याचा यशस्वी प्रयत्न होतो असे अनेक ठिकाणी सिध्द झालेले होते.त्यामुळे भारतात स्वयंसहाय्यता गट स्थापन करण्यास प्रेरणा देण्यात आली.या गटामुळे बँकींग सुविधापासून वंचित असणाऱ्या अपवर्जित लोकांना बँकींग सेवांचा लाभ होण्यास मदत झाली आहे.

नाबार्डच्या मते भारतात २.२ दशलक्ष स्वयंसहाय्यता बचत गट असून ३३ दश लक्ष सदस्य् या गटाशी जोडले गेलेले आहेत.दक्षिणेकडील आंध्रप्रदेश,तामिळनाडू,केरळ व कर्नाटक राज्यातील ५७% गट २००५-२००६ मध्ये बँकांशी संलग्न किंवा जोडलेले होते.(विकीपेडीया) सरकारने १९९२ मध्ये चालू केलेल्या स्वयंसहाय्यता गट बँक संयोजन कार्यक्रमा अंतर्गत ३१ मार्च २००९ अखेर ६.१ दशलक्ष कुटुंबातील स्वयंसहाय्यता गटातील लोकांची बचतखाती बँकेशी जोडलेली होती.तर ४.२ दशलक्ष गटांची पतखाती बँकेशी जोडलेली होती व ८६ दशलक्ष गरीब कुटुंबांना या योजनेने सामावून घेतलेले होते.या योजनेअंतर्गत २०१५ पर्यंत १०० दशलक्ष कुटुंबांना सामावून घेण्याचे उद्दिष्ट होते.(ए.अमरेंदर रेड्डी आणि धर्म पाल मलीक)

गरीबी निर्मूलनासाठी बँकेच्या मदतीने केंद्र व राज्य सरकारच्या अनुदानाने (७५:२५) १ एप्रिल १९९९ मध्ये सुरू केलेल्या सुवर्ण जयंती ग्राम स्वराज योजनेचे स्वयंसहाय्यता गट मुख्य घटक आहेत.ही योजना चालू झाल्या पासून सन २००६-२००७ अखेर २२.५२ लाख गट स्थापन झालेले असून त्या अंतर्गत देशात ६६.९७ लाख स्वयंरोजगार स्थापन झालेले आहेत.व त्यात ३५.५४ लाख लोक सहभागी झालेले असून त्यापैकी ३१.४३ लाख लोकांनी वैयक्तीक रोजगार सुरू केलेला आहे.व त्यात १४४०३.७३ कोटी रूपयांची गुंतवणूक झालेली आहे.व त्यातील एकूण रोजगारा पैकी अनुसुचीत जाती-जमातींच्या(SCs/STs) लोकांनी सुरू केलेल्या रोजगाराचे प्रमाण ४५.५४ % व महिला स्वयंसहाय्यता गटांचे प्रमाण ४७.८५% होते.

भारत सरकारने सन २०११ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण उदरनिर्वाह अभियान (आजीविका)(National Rural livelihood Mission) सुरू केलेले होते.या अभियानाअंतर्गत चालू झालेल्या स्वयंसहाय्यता गटांची ३१/३/२०१४ अखेर संख्या १८,६४,७४२ होती.ती वाढून ३१/७/२०१५ अखेर २३,०५,५१३ इतकी झाली.या कालावधीत स्वयंसहाय्यता गट वाढीचे प्रमाण २३.६४% इतके होते.तसेच अनुसुचीत जातीच्या(SCs) लोकांनी सुरू केलेल्या स्वयंसहाय्यता गटांची ३१/३/२०१४ अखेर संख्या २,८५.५८० होती.ती वाढून ३१/७/२०१५ अखेर ३,९४,०४१ इतकी झाली.या कालावधीत स्वयंसहाय्यता गट वाढीचे प्रमाण ३७.९८ % इतके होते. तसेच अनुसुचीत जमातीच्या (STs)लोकांनी सुरू केलेल्या स्वयंसहाय्यता गटांची ३१/३/२०१४ अखेर संख्या १,२८,८८५ होती.ती वाढून ३१/७/२०१५ अखेर १,९५,८२० इतकी झाली.या कालावधीत स्वयंसहाय्यता गट वाढीचे प्रमाण ५१.९३ % इतके होते. तसेच अल्पसंख्यांक लोकांनी सुरू केलेल्या स्वयंसहाय्यता गटांची ३१/३/२०१४ अखेर संख्या ८१,९०० होती.ती वाढून ३१/७/२०१५ अखेर १,१७,१७७ इतकी झाली.या कालावधीत स्वयंसहाय्यता गट वाढीचे प्रमाण ४३.०७ % इतके होते. तसेच दिव्यांग(PWDs) लोकांनी सुरू केलेल्या स्वयंसहाय्यता गटांची ३१/३/२०१४ अखेर संख्या १९,९०० होती.ती वाढून ३१/७/२०१५ अखेर २६,७६४ इतकी झाली.या कालावधीत स्वयंसहाय्यता गट वाढीचे प्रमाण ३४.४९ % इतके होते.(Community.data.gov.in)

भारतातील सन २०११-१२ व सन २०१२-१३ मधील स्वयंसहाय्यता गटांची संख्या व त्या गटांनी केलेली बचत पुढील कोष्टकावरून लक्षात येते.

## स्वयंसहाय्यता गटांची राज्यानुसार संख्या व बचत

| राज्य | वर्ष २०११-१२ स्व.गट संख्या | बचत रक्कम | वर्ष २०११-१२ स्व.गट संख्या | बचत रक्कम | वाढ(%) स्व.गट संख्या | बचत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | १,४९५,९०४ | १४,९०१.६ | १,४२१,३९३ | २५,४१७.९ | -४.९८ | ७०.५७ |
| तामिळनाडू | ९२५,३९२ | ७,९०३.९८ | ८७३,०१२ | ८,४९६.६८ | -५.६६ | ७.५ |
| महाराष्ट्र | ८२७,०४७ | ७,२३६.१८ | ६८७,७१७ | ५,१३७.०४ | -१६.८५ | -२९.०१ |
| पश्चिम बंगाल | ६८५,४४८ | ३,७६९.४४ | ५८६,८२१ | ७,२६९.४९ | -१४.३९ | ९२.८५ |
| कर्नाटक | ६२८,६२३ | १०,०२२१.३ | ६४५,६९५ | ११,५६१.९ | २.७१ | १५.३७ |
| केरळ | ६१५,७१४ | ४,१३७.११ | ५८१,३२५ | ५,१७५.८९ | -५.५९ | २५.११ |
| ओरीसा | ५४०,०२९ | ३,६१३.६४ | ५२२,८३७ | ४,१८.७८ | -३.१८ | १५.७५ |
| उत्तरप्रदेश | ४७१,१८४ | ३,६८२.१४ | ४०३,९३२ | ३,९२०.०८ | -१४.२७ | ६.४६ |
| बिहार | ३०५,११३ | १,४०४.२४ | २७०,८९० | १,६९६.७६ | -११.२२ | २०.८३ |
| आसाम | २७६,५६५ | ९८४.६ | २७१,०७२ | १,०७५.०८ | -१.९९ | ९.१९ |
| राजस्थान | २५१,६५४ | १,२७८.७१ | २३१,७६३ | १,५७६.०७ | -७.९ | २३.२५ |
| गुजरात | २२६,६२६ | १,३९६.३२ | २०८,४१० | १,७५५.५१ | -८.०४ | २५.७२ |
| मध्यप्रदेश | १६३,५८८ | १,१२२.९१ | १५९,४५७ | १,२३२.१२ | -२.५३ | ९.७३ |
| छत्तिसगड | १२९,८५४ | ७३९.४५ | ९८,४९३ | ६१३.६ | -२४.१५ | -१७.०२ |
| झारखंड | ८९,६०३ | ६७२.१८ | ८५,३३४ | ७६८.९९ | -४.७६ | १४.४ |
| हिमाचलप्रदेश | ६५,६४१ | ३२८.८६ | ५३,२४२ | ४२७.७९ | -१८.८९ | ३०.०८ |
| उत्तराखंड | ४८,१४१ | ५९१.३३ | ४०,३१६ | ४७६.३६ | -१६.२५ | -१९.४४ |
| हरीयाना | ४४,१८४ | ३७६.८४ | ४२,५८० | ४०३.०७ | - ३.६३ | ९.५८ |
| पंजाब | ३७,३४३ | ४६६.२६ | ३५,०६० | ३६३.५५ | - ६.११ | -२२.०३ |
| त्रिपुरा | ३४,०२१ | ३३७.८ | १०,४३८ | २१.९३ | -६९.३२ | -९३.५१ |
| | वर्ष २०११-१२ स्व.गट संख्या | बचत रक्कम | वर्ष २०११-१२ स्व.गट संख्या | बचत रक्कम | वाढ(%) स्व.गट संख्या | बचत रक्कम |
| पाँडेचेरी | १७,९१३ | १६८.२९ | २०,०५३ | १७३.१६ | ११.९५ | २.८९ |
| मेघालय | १४,०९१ | ४१.४७ | ९,५७३ | ५१.५७ | -३२.०६ | २४.३३ |
| मनिपुर | १२,७११ | २१.९४ | १२,६५६ | २३.५२ | -०.४३ | ७.२३ |
| नागालॅन्ड | १०,७११ | ३७.४५ | ८,४७८ | १८.५९ | -२०.८५ | -५०.३७ |
| गोवा | ८,४१४ | ८६.८७ | ९,८८९ | ६६.०७ | १७.५३ | -२३.९४ |
| अरूनाचलप्रदेश | ८,३६३ | १६.६३ | ५,०३३ | ४१.२१ | -३९.८२ | १२१.१७ |
| जम्मु-काश्मीर | ६,३४९ | ४३.३१ | ५,७९६ | ९७.०५ | -८.७१ | १२४.०९ |
| आंदमान-निकोबार | ५,५२१ | १३.१३ | ५,२१७ | १४.५७ | -५.५१ | ११.०१ |
| सिक्कीम | ५,२८० | २६ | ३,५२९ | ७.९५ | -३३.१६ | -६९.४३ |
| मिझोरम | ४,९७६ | ५७.२९ | ३,११७ | ६१.२२ | -३७.३६ | ६.८६ |
| नवी दिल्ली | ३,५३६ | ३२.५ | ३,७८७ | ३४.८१ | ७.१ | ७.०९ |
| छत्तीशगड | ६१९ | १०.२१ | ६०९ | ९.५१ | -१.६२ | -६.८५ |
| लक्ष्वद्विप | १७१ | १.२५ | २७ | ०.७२ | -८४.२१ | -४२.५५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | ७,९६०,३४९ | ६५,५१४.१ | ७,३१७,५५१ | ८२,१७२.५ | -८.०७ | २५.४३ |

संदर्भ:NABARD.2012.Status of Microfinance in India 2011-12,MicroCredit Innovation Department (MCID),Mumbai,NABARD.2013.Status of Microfinance in India 2012-13,Micro Credit Innovation Department (MCID),Mumbai

वरील कोष्टकावरून असे लक्षात येते की सन २०११-१२ व सन २०१२-१३ या दोन्ही वर्षी सर्वात जास्त स्वयंसहाय्यता गट आंध्रप्रदेश राज्यात स्थापन झालेले आहेत परंतु सन २०११-१२ च्या तुलनेत सन २०१२-१३ साली गट स्थापनेत ९.९८ टक्कयांनी घट झालेली आहे.परंतु बचतीच्या प्रमाणात मात्र वाढ झालेली आहे.सर्वात जास्त बचत (१२४.०९%)जम्मु आणि काश्मीर राज्यात झालेली आहे.त्यानंतर अरूणाचल प्रदेश राज्याचा (१२१.१७%) क्रमांक लागतो. सन २०११-१२ च्या तुलनेत सन २०१२-१३ साली सर्वात जास्त गट(१७.५३%) गोवा राज्यात स्थापन झालेले आहेत. त्यानंतर अरूणाचल प्रदेश राज्याचा (११.९५%) क्रमांक लागतो.

भारतातील स्वयंसहाय्यता गट बँकांनी प्रेरणा देऊन व वित्त पुरवठा करून स्थापन झालेले आहेत,तर काही गट अशासकीय संघटनांनी स्थापन करून बँकांनी त्यांना वित पुरवठा केलेला आहे,तर काही गटांची संघटना आहे,तर काही गट अशासकीय संघटनांनी/संस्थांनी/इतर संघटनांनी प्रेरणा देऊन व सुक्ष्म वित्त संस्थांनी वित्त पुरवठा करून स्थापन झालेले आहेत,तर काही गट व्याज न घेणाऱ्या संस्थांनी स्थापन केलेले आहेत.सन २००६ मध्ये ४३२३ अशासकीय संस्था बँकेशी संलग्न होत्या व २,२३८,५२५ स्वयंसहाय्यता गट बँकेशी संलग्न होते.या गटांना २८ टक्के अशासकीय संस्थांनी व ५१ टक्के शासकीय संस्थांनी व २१ टक्के बँकांनी गट स्थापन करण्यास प्रेरणा दिलेली होती.(नाबार्ड)

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया द्वारा सुरू असलेल्या वित्तीय सेवा कार्याअंतर्गत १,८१,७५३(मार्च२०१२)गावात व २,६८,४५४(मार्च२०१३) गावात वित्तीय सेवा पुरविल्या जात होत्या.वित्तीय समावेशनासाठी आर.बी.आय.द्वारा पुढील पावले उचलली गेली आहेत.

**१) मोबाईल बँकींग-**मोबाईलच्या सहाय्याने बँकींग सुविधांचा लाभ गेतला जातो.त्यासाठी मोबाईल ॲपचा वापर केला जातो.आर.बी.आय.ने ८० बँकांना मोबाईल बँकींगसाठी मान्यता दिलेली आहे.वर्ष २०१४ अखेर ३५.५३ दश लक्ष लोकांनी मोबाईल बँकींग सेवेसाठी सदस्यत्व स्विकारलेले आहे.याच कालावधीत ९४.७१ दश लक्ष वेळा २२४.३८ अब्ज रूपये किमतीचे तर ३१ मार्च २०१५ अखेर १७२ दश लक्ष वेळा १०३५ अब्ज रूपये किमतीचे हस्तांतरण झालेले आहे.त्यामुळे बँकांचा कामाचा ताण कमी होण्यास मदत झाली आहे.

**२) बँक प्रतिनिधी-**Banking/Business Correspondent(B.Cs.) qH$dm Business Facilitators (B.Fs) ही योजना आर.बी.आय.ने २००६ मध्ये सुरू केली.प्रत्येक गावात बँकांना आपल्या शाखांचा विस्तार करणे आर्थिकदृष्ट्या शक्य होत नाही,त्यावर उपाय म्हणून ग्रामीण भागात व अर्धनागरी भागात बँक सेवेचा प्रतिनिधी म्हणून ही योजना सुरू केली गेली.या योजने अंतर्गत बँकींग सेवा पुरवण्यासाठी बँकेचा प्रतिनिधी म्हणून किराणा दुकाणदार,मेडीकल दुकाणदार,दुरध्वनी केंद्र चालवणारी व्यक्ती,अल्पबचत एजंट,विमा कंपण्याचा प्रतिनिधी,पेट्रोल पंप चालक,सेवा निवृत्त शिक्षक,बँकेशी जोडलेला अधिकृत स्वयंसहाय्यता गट व बिगर वित्तीय संस्थेचा प्रतिनिधी इत्यादीची नेमणूक करता येते.हे प्रतिनिधी ग्राहकांना बँकेच्या प्राथमिक सुविधा पुरवितात व वित्तीय समावेशनास मदत करतात.आर.बी.आय.नुसार भारतात ३१ मार्च २०१३ अखेर २२१,३४१ बँक मित्र ६३५,६५३ पॉट ऑफ सेल्स् (Point of sales) मशिनसह कार्यरत आहेत.

**३) प्रधानमंत्री जनधन योजना-**या योजनेची घोषणा प्रधानमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०१४ रोजी केली.परंतु या योजनेची प्रत्यक्ष सुरूवात २८ ऑगस्ट २०१४ रोजी झाली.या योजने अंतर्गत आत्ता पर्यंत ११ कोटी जनधन खाती बँकेत सुरू झालेली आहेत.ज्यांचे बँकेत खाते नाही व ज्यांचे खाते बँकेत चालू स्थितीत आहे अशा लोकांना नव्याने या योजनेत सामऊन घेता येते व या योजनेचा लाभ घेता येतो.गरीब लोकांना लक्षात घेऊन ही योजना तयार केलेली असून या योजने अंतर्गत पुढील प्रकारचे फायदे लाभार्थ्याला मिळतात.१) जीवन विमा सुविधा-खाते धारकाला ३०,०००रूपयांपर्यंतचे विमा संरक्षण मिळू शकते.तसेच अपघाती मृत्यू झाल्यास एक लाख रूपये खाते धारकाच्या उत्तराधीकाऱ्याला मिळू शकतात.२) कर्ज सुविधा-सहा महीण्याच्या अंतराने खाते धारकाला ५००० रूपयांचे कर्ज मिळू शकते.३) रूपे कार्ड सुविधा-इतर ए.टी.एम.कार्ड प्रमाणेच या

योजने अंतर्गत रूपे कार्ड खातेधारकाला दिले जाते.ज्याचा उपयोग करून व्यक्ती कोणत्याही ए.टी.एम.मशिन मधून पैसे काढू शकतो.४) झिरो बॅलन्स सुविधा-रक्कम न भरता खाते खोलता येते.५) मोबाईल सुविधा-खात्याची सर्व माहिती मोबाईलवर मेसेजच्या माध्यमातून घेता येते.६) वयोमर्यादा-दहा वर्षापुढील मुलांना खाते खोलता येते.७) ओळख पत्रासंबंधी-बँक खाते खोलताना ओळखपत्र आवश्यक असते परंतु ज्याच्या कडे ओळखपत्र नसेल अशी व्यक्ती कोणत्याही गॅजेटेड ऑफीसरकडून सत्यापीत केलेल्या ओळखीच्या आधारावर खाते खोलता येते.अशा खात्याला बँक Low risk account श्रेणीत समाविष्ठ करते.

## समारोप:

भारताचे माजी वित्तमंत्री व माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी वित्तीय समावेशनासाठी वित्तीय साक्षरता अधिक आवश्यक व महत्वाची आहे असे म्हटलेले आहे.त्यांच्यामते बँकींग आणि वित्तीय व्यवस्थेकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलण्याची गरज आहे.भारतात अलिकडे वित्तीय साक्षरतेत वाढ झालेली दिसून येते. वित्तीय साक्षरतेमुळे लोकांना काटकसर करण्याची व बचत बँकेत ठेवण्याची सवय लागेल,सरकारला कल्याणकारी योजनावर केलेला खर्च योग्य/लक्ष गटा पर्यंत वित्तीय प्रणाली मार्फत पोहोचविता येईल.

भारतातील सर्व सुक्ष्म सहाय्यता गटांचा विचार केला असता असे दिसून येते की दक्षिण भारतात सुक्ष्म सहाय्यता गटांचा विकास झालेला आहे,इतर राज्यात विकास होणे अपेक्षीत आहे. सुक्ष्म सहाय्यता गटांनी कर्ज वाटप करताना कर्जदाराची कुवत पाहून कर्ज वाटप करावे कारण चूकीच्या व्यवस्थापनामुळे आंध्रप्रदेशमध्ये अनेक कर्जदारांनी आत्महत्या केलेल्या आहेत.व्यक्ती किंवा समाजाच्या संबंधीत काही अघटीत घटना घडल्यामुळे या संस्था अडचणीत येताना दिसतात.उपासमारी सारख्या आपत्तीमुळे कर्जदारांची कर्जफेडीची आशा नष्ट झालेली काही ठिकाणी दिसून येते.मेगेल कमिटीच्या शिफारशीचा विचार करता सुक्ष्म सहाय्यता गटांनी कर्जाच्या व्याजाचा दर वार्षिक २४ टक्कया पेक्षा अधिक ठेऊ नये.तसेच या गटांनी आपल्या व्यवहाराचे जमा-खर्चाचे व्यवस्थापन योग्य प्रकारे ठेवावे.इतर संस्थांचे अनुकरण करून नवीन स्थापन झालेल्या संस्था समोर भविष्यातील कार्याची दुरदृष्टी नसल्याने अनेक संस्था अडचणीत आलेल्या दिसतात.तसेच या संस्थात प्रशिक्षीत कर्मचारी असणे आवश्यक आहे.प्रशिक्षीत असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे गळतीचे प्रमाण जास्त असल्यामुळे अनेक संस्था कार्यक्षमरीत्या कार्य करू शकत नाहीत.काही संस्थांनी संस्था स्थापनेच्या कालावधीतील विकासाची गती नंतर निरंतर ठेवलेली दिसून येत नाही.आर्यूविम्याच्या सेवेचा लाभ अनेकांनी घेणे अपेक्षित आहे.स्वयंसहाय्यता गटांनी त्यासाठी पुढाकार घेणे अपेक्षित आहे.ग्रामीण भागात मोबाईल बँकींगचा वापर वाढणे अपेक्षित आहे.

## संदर्भ:

१) www.investdedia.org

२) Gert Van Maanen,Micro credit:Sound business or Development Instrument,Oikocredit,2004

३) Status of Microfinance in India.NABARD annual Report 2016-17.

४) रोहन व्यंकटरमनकृष्णन ब्लॉग

५) www.community.data.gov.in

६) M-Service in India:A Study on Mobile Banking and applications.by Nisha Sharma.GIAN JYOTI E-Journal.Volume.6,Issue 2(Apr-Jun2016)

७) प्रा.डॉ.मुलाणी महंमदरफीक उमराव:कृषी अर्थशास्त्र,सकसेस पब्लिकेशन,पूणे.२००९.



श्री.पठाण आर.एम.
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शंकरराव जगताप आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज,वाघोली.ता.कोरेगाव जि.सातारा.
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर संलग्न